# पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण यांचे कार्यालय,

चव्हाणनगर पाषाण रोड, पुणे -४११००८
दुरध्वनी क्रमांक-०२०-२५६५७८७८ फॅक्स क्रमांक-०२०-२५६७४६४१

(आस्थापना शाखा)

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण पोलीस शिपाई चालक भरती २०२१

## -: उमेदवारांसाठी सूचना :-

पोलीस शिपाई चालक पदाची मैदानी चाचणी दिनांक ०६/०१/२०२३ ते १७/०१/२०२३ पर्यंत पोलीस मुख्यालय पुणे ग्रामीण येथील कवायत मैदानावर घेण्यात आली असून त्या बाबतचे प्रवर्गनिहाय गुण दररोज प्रसिध्द करण्यात येत होते.

दिनांक १५.०३.२०२३ रोजी कौशल्य चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची गुणनिहाय तात्पुरती यादी पोलीस मुख्यालय, पुणे ग्रामीण येथे प्रकाशित करण्यात आली होती. सदरचे यादीमध्ये उमेदवारांचे आक्षेपांनुसार पुर्तता करुन आज दिनांक १७.०३.२०२३ रोजी कौशल्य चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची गुणनिहाय सुधारित यादी पोलीस मुख्यालय, पुणे ग्रामीण येथे प्रकाशित करण्यात आली आहे.

सोबत जोडलेल्या यादीमध्ये नमूद उमेदवारांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकास वाहन चालविण्याच्या कौशल्य चाचणी करिता सकाळी ०५.३० वाजता COEP इंजिनिअरिंग कॉलेज मैदान, शिवाजीनगर, पुणे ०५. येथे उपस्थित राहावे.

उमेदवारांनी वाहन चालविण्याच्या कौशल्य चाचणी करिता येताना ऑनलाईन प्रवेशपत्र सोबत आणावे. प्रवेशपत्र न आणल्यास कौशल्य चाचणीकरिता प्रवेश दिला जाणार नाही. तसेच अ) हलके मोटार वाहन चालविण्याची चाचणी २५, गुण ब) जीप प्रकारातील वाहन चालविण्याची चाचणी २५ गुण अशी एकुण ५० गुणांची वाहन चालविण्याची कौशल्य चाचणी घेण्यात येणार असून, उमेदवारांना वाहन चालविण्याच्या कौशल्य चाचणीमध्ये ४०% गुण घेऊन उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. जे उमेदवार ४०% गुण घेउन उत्तीर्ण होतील ते उमेदवार लेखी परिक्षेकरिता पात्र राहतील. तसेच कौशल्य चाचणी ही केवळ एक अर्हता चाचणी असून कौशल्य चाचणीत मिळालेले गुण, गुणवत्ता यादी तयार करण्यासाठी विचारात घ्यावयाच्या एकूण गुणात समाविष्ट केले जाणार नाहीत याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

( अंकित गोयल ) भा.पो.से
पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण.

CamScanner